दारिद्रय रेषेच्या यादीत नांव नसलेल्या ६५ किंवा ६५ वर्षावरील वृध्दांना श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना लागू करण्याबाबत.

## महाराष्ट्र शासन

शासन निर्णय क्रमांक : विसयो-२००८/प्र.क्र.७८/विसयो-१,
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
मंत्रालय, विस्तार भवन,मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २९ जून,२००९

वाचा : १) शासन निर्णय क्रमांक : विसयो-२००८/प्र.क्र.७८/विसयो-१, दिनांक ३० सप्टेंबर, २००८

२) शासन निर्णय क्रमांक : विसयो-२००८/प्र.क्र.७८/विसयो-१, दिनांक २७ फेब्रुवारी, २००९

३) शासन परिपत्रक क्रमांक : विसयो-२००८/प्र.क्र.७८/विसयो-१, दिनांक ६ मे,२००९

**प्रस्तावना** :- इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्ती वेतन योजनेमध्ये ६५ वर्षे वा ६५ वर्षांवरील वृध्दांना केंद्र शासनाचे २००/- रुपये व राज्य शासनाचे श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजनेचे ३००/-रुपये असे एकूण ५००/- रुपये मिळत आहेत. इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजनेमध्ये दिनांक २३ सप्टेंबर २००७ पासून दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या यादीत नांव असण्याची अट घातल्यामुळे, केवळ ६५ वर्ष व त्यावरील व्यक्तींना दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या यादीतील व्यक्तींना लाभ मिळतो. काही लाभार्थी ६५ वर्ष व त्यावरील असून, त्यांचे दारिद्रय रेषेखालील यादीत नांव नाही **अशांना नव्याने निवृत्ती वेतन** सुरु करण्यासाठी शासनाकडे मागणी असल्याने, त्यांचा विचार करुन अशा वृध्दांना राज्य शासनाकडून संपूर्ण ५००/- रुपये निवृत्तीवेतन देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. या अनुषंगाने खालील निर्णय घेतलेला आहे.

**शासन निर्णय : १) लाभार्थ्यांच्या निवडीचे निकष** :- ज्या व्यक्ती ६५ वर्ष व त्यावरील आहेत (ज्याचे नांव संजय गांधी निराधार योजनेत नाही अशा व्यक्तींनासुध्दा) त्यांचे कुटुंबाचे एकूण वार्षिक उत्पन्न रुपये २१,०००/- च्या आत आहे. तसेच ज्यांचे नाव दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या यादीत नाही अशा वृध्दांना श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजनेतून शासनाकडून दरमहा रुपये ५००/- देण्यात येतील. यासाठी शासन निर्णय दिनांक ३० सप्टेंबर २००८ च्या परिशिष्ट ५ मधील नमुना १३ मध्ये शासनास अहवाल पाठविणे आवश्यक राहिल.

जिल्हाधिकारी रत्नागिरी
शाखा:-
आवक नं.:- ५०१
का. नि. नं.:- 1108/2
- 4 AUG 2009
तहसिलदार उप जिल्हाधिकारी

**२) अटी व शर्ती :-** या योजनेच्या लाभार्थींची निवड तसेच इतर उर्वरित अटी व शर्ती वर नमूद केलेल्या उपरोक्त क्रमांक १ येथील दिनांक ३० सप्टेंबर २००८ च्या शासन निर्णया प्रमाणे राहिल.

**३) अर्जाचा नमुना :-** या योजनेकरीता करावयाच्या अर्जाचा नमुना सोबत जोडला आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २००९०६२९१५२२५४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( एन. आरुमुगम )
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा. राज्यपालांचे सचिव
मा. मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव
मा. उप मुख्यमंत्र्याचे सचिव
सर्व जिल्हयांचे पालक मंत्री
सर्व मंत्र्यांचे खाजगी सचिव
सर्व राज्यमंत्र्यांचे खाजगी सचिव
सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष
मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) १/२, महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर
सचिव, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार, कृषि भवन, नवी दिल्ली
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
संचालक, नागरी प्रशासन, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई
वित्त विभाग (व्यय-१४ / अर्थसंकल्प -७), मंत्रालय, मुंबई
सर्व मंत्रालयीन विभाग / सर्व विभागीय आयुक्त /सर्व महापालिका आयुक्त /सर्व पोलीस आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी / सर्व जिल्हा पोलीस अधीक्षक/सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई
अधिदान व लेखा अधिकारी व लेखा कार्यालय, मुंबई
विभागीय समाजकल्याण अधिकारी (मुंबई/नाशिक/पुणे/औरंगाबाद/अमरावती/नागपूर)
सर्व उप विभागीय उप जिल्हाधिकारी (प्रांत अधिकारी)/ तहसिलदार / नायब तहसिलदार ( संगायो)
सर्व कोषागार अधिकारी / सर्व पंचायत समितींचे गट विकास अधिकारी
सर्व उप कोषगार अधिकारी / सर्व पंचायत समितींचे गट विकास अधिकारी
सर्व अधिकारी, सा.न्या.व वि.स.विभाग,मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती / का.विसयो-१

शासन निर्णय क्रमांक : विसयो-२००८/प्र.क्र.७८/विसयो-१, दिनांक २९ जून,२००९ चे सहपत्र.

**(६५ किंवा ६५ वर्षावरील दारिद्रय रेषेच्या यादीत नांव नसलेल्या वृध्दांना श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना लागू करण्याबाबत करावयाच्या अर्जाचा नमुना)**

प्रति,

तहसिलदार

तालुका-

जिल्हा-

१. अर्जदाराचे संपूर्ण नांव :

२. पत्ता :

३. जन्मतारीख व वय :

(दिनांक ३० सप्टेंबर २००८ च्या शासन निर्णयातील तरतुदीप्रमाणे वयाच्या पुराव्याचे प्रमाणपत्र)

४. कुटुंबाचे सर्व मार्गांनी मिळणारे एकूण वार्षिक उत्पन्न :

(दिनांक ३० सप्टेंबर २००८ च्या शासन निर्णयातील तरतुदीप्रमाणे वार्षिक उत्पन्नाचे प्रमाणपत्र)

मी असे जाहिर करतो/करते की, मी वर दिलेली माहिती सत्य व बिनचूक असून, मी शासनाच्या अन्य कोणत्याही योजनेखाली नियमित आर्थिक लाभ घेत नाही. सदरची माहिती चुकीची आढळल्यास माझ्या विरुध्द फौजदारी कारवाईसह इतर कारवाई करण्यास मी पात्र असल्याची मला जाणीव आहे.

स्थळ :-

दिनांक :-

उजव्या किंवा डाव्या हाताच्या अंगठयाचा ठसा अर्जदाराची सही

टिप :- अर्जदाराने सही व अंगठयाचा ठसा देणे बंधनकारक आहे.

५. माझ्या समक्ष श्री./श्रीमती.--------------------------------ह्याने/हिने सही व अंगठयाचा ठसा दिलेला आहे.

साक्षीदाराचे नांव व पत्ता : साक्षीदाराची सही (दिनांकासह)

------